साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

# विपस्सना

साधक (मराठी)

बुद्धवर्ष 2568, भाद्रपद पौर्णिमा, 18 सप्टेंबर, 2024 वर्ष 8 अंक 6

**वार्षिक शुल्क** रु. 100/- मात्र (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50)

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

**धम्मवाणी**

**यं त्वेव जञ्ञा सदिसो ममन्ति, सीलेन पञ्ञाय सुतेन चापि।**
**तेनेव मेत्तिं कयिराथ सद्धिं, सुखो हवे सप्पुरिसेन सङ्गमो॥**

*– जातक पाळि-1, इन्दसमानगोत्तजातकं*

– ज्याला शील, प्रज्ञा आणि श्रुत ज्ञानात आपल्यासारखे जाणाल, त्याच्या सोबतच मैत्री करा, सत्पुरुषांचा सत्संग सुखद असतो.

## मित्रता फलवती झाली !

**पुक्कुसाति (3)**

**मागील अंकावरून पुढे.....**

नगराच्या बाहेर भार्गव कुंभकारा(कुंभारा)चे एक छोटेसे घर दिसत आहे. कुंभकाराला भांडी आणि इतर गोष्टी बनविण्यासाठी पुष्कळशा मातीची आवश्यकता असते. त्यामुळे नगराच्या बाहेर जिथे अशी सुविधा असेल तिथेच त्याचे निवास-स्थान असणे स्वाभाविक आहे. आम्ही हे जाणत नाही की भार्गव हे या कुंभकाराचे नाव आहे की गोत्र ज्याच्यामुळे तो या नावाने ओळखला जातो. होऊ शकते जसे आज कुंभकाराला प्रजापतिच्या नावाने जाणले जाते त्याच प्रकारे त्या दिवसांत भार्गव नावाने बोलावत असतील कारण की प्राचीन साहित्यात आपल्याला अनेक भार्गव कुंभकारांचा उल्लेख मिळतो.

जे असेल ते, हा भार्गव कुंभार अत्यंत श्रद्धाळू आहे. साधू-संतांच्या सेवा-सुश्रुषेत आणि सत्संगात रुची ठेवतो. त्यांच्या सुख-सुविधेकरीता आपल्या घराच्या जवळ त्याने एक विश्रामशाळा बांधली आहे की जी कुंभकार-शाळेच्या नावाने प्रसिद्ध आहे. यामध्ये यात्री तसेच साधू-संन्यासी एक-दोन दिवसांसाठी येत-जात राहतात. कधी भगवान बुद्ध आणि कधी सारिपुत्र तसेच त्यांचे शिष्यही रात्रीच्या मुक्कामाकरीता या कुंभकाराच्या विश्रामशाळेत थांबत असतात. आज देखील भगवान बुद्ध सूर्यास्तानंतर या कुंभकाराकडे आले आहेत आणि त्याला विचारत आहेत– "भार्गव कुंभकार, काय मी तुमच्या अतिथिशाळेत आजची रात्र थांबू शकतो? तुम्हाला ओझे तर वाटणार नाही?"

"नाही भंते! भगवान, माझ्यासाठी तर ही असीम पुण्याची गोष्ट होईल. कुंभकार-शाळेचा कक्ष खूप मोठा आहे. त्यात एका वेळी एकापेक्षा अधिक लोक आरामशीर राहू शकतात. परंतु आत्ता काही वेळापूर्वी मी एका श्रमणाला तिथे थांबण्याची अनुमती दिलेली आहे. त्याला विचारावे, त्याची काही हरकत नसेल तर भगवानांनी तिथे सुखपूर्वक राहावे."

भगवान कुंभकार-शाळेत गेले. तिथे पाहिले, फाटके चीवर घातलेला एक श्रमण बसला आहे. गोरा रंग आहे, उन्नत ललाट (कपाळ) आहे, मोठे डोळे आहेत, लांब नाक आहे. डोक्यावरचे आणि दाढी-मिशीचे कापलेले केस दोन-दोन बोटे वाढले आहेत. योद्ध्यांसारखी रुंद छाती आहे. सबळ सुडौल हात-पाय आहेत. सर्व मिळून मोठे भव्य व्यक्तीमत्व आहे. भगवानांनी त्याला पाहून स्मित-हास्य केले. त्यांनी विचारले "भिक्षू! या कक्षात मी तुमच्याबरोबर एक रात्र थांबू? तुम्हाला ओझे तर वाटणार नाही?"

"नाही, आयुष्मान थोडेदेखील नाही, कुंभकार-शाळेचा हा कक्ष खूप मोठा आहे. मोठ्या आनंदाने आपण इथे रात्री थांबा. मला तर केवळ मांडी घालून बसण्याइतकी जागा हवी आहे. तुम्ही इथे सुखपूर्वक रहा."

तृणासन अंथरून भगवान एका बाजूला बसले आणि ध्यानमग्न झाले. आधी आलेला भिक्षूही ध्यानस्थ बसला आणि लगेचच चौथ्या ध्यान-समापत्तीत समाधिस्थ झाला.

हळूहळू रात्र पुढे जाऊ लागली. रात्रीचा पहिला प्रहर संपला, दुसरा प्रहर संपला, आता तिसरा संपत होता. पौर्णिमा होती. आकाश संपूर्ण रात्र चंद्रप्रभेने प्रभासित झाले होते. धरतीच्या अंगणात चांदण्यांची पाखरण झाली होती. उघड्या असलेल्या खिडक्यांमधून चांदण्यांचा प्रकाश कक्षातही पसरला होता. भगवान बुद्धांना आणि भिक्षूला चंद्र-किरणे स्पर्श करत होती. भगवान तर बोधिरश्मींनी स्वत: प्रभास्वर होतेच, भिक्षूचा चेहराही ध्यान समापत्तीच्या प्रभेने प्रदीप्त झाला होता. चंद्राची शुभ्र ज्योत्स्ना त्या दोघांच्या चेहऱ्यांना आणखी अधिक उजळवित होती. भिक्षू बराच वेळ न हलता-डुलता अधिष्ठान आसनात बसला होता. तिसऱ्या प्रहरादरम्यान त्याने डोळे उघडले! भगवानांनी त्याच्याकडे पाहिले आणि मंद स्मित केले. त्यांनी विचारले –

"भिक्षू, तुम्ही कोणावर आश्रित होऊन गृहत्यागी झाला आहात? तुमचा शास्ता कोण आहे, कोण आचार्य आहे? कोणाच्या द्वारे उपदेशित धर्म तुम्हाला रुचिकर आहे?"

भिक्षूने उत्तर दिले, "आयुष्मान लोकात सम्यक संबुद्ध उत्पन्न झाले आहेत, ज्यांची कीर्ती चहूकडे पसरली आहे. मी त्याच शाक्यमुनी भगवान गौतम बुद्धांचा आश्रय घेऊन घरातून बेघर झालो आहे. तेच माझे शास्ता आहेत. त्यांचाच उपदेशित धर्म मला रुचिकर वाटतो."

भगवानांनी पुन्हा स्मितहास्य केले. त्यांनी विचारले "भिक्षू, काय तुम्ही आपल्या शास्त्याला कधी पाहिले आहे? आणि पाहिले तर ओळखू शकाल?"

"नाही, आयुष्मान! नाही ओळखू शकणार. मी त्यांना कधी पाहिले नाही."

"या वेळी तुमचे शास्ता कुठे आहेत?"

"इथे आल्यावर समजले की ते श्रावस्तीच्या जेतवनात विहार करीत आहेत. येताना रस्त्यात मी जेतवन विहाराच्या समोरून गेलो पण तेव्हा मी असे समजत होतो की त्यांना मगधमध्ये संबोधि प्राप्त झाली आहे तेव्हा ते मगधमध्येच विहार करत असतील. आता त्यांना भेटण्यासाठी पुन्हा 45 योजने श्रावस्तीकडे परत जावे लागेल."

भगवान पुन्हा हसले. त्यांनी आपल्या बोधिचित्ताने पाहिले की भिक्षूचे आयुष्य खूप थोडे शिल्लक राहिले आहे. सूर्योदयानंतर काही वेळातच त्याची शरीर-च्युति होईल. माझ्याच निमित्ताने हा प्रव्रजित झाला आहे. खूप योग्य पात्र आहे. अनेक जन्मांच्या पुण्य पारमितांचा धनी आहे. विपश्यना शिकवली गेली तर लगेचच विमुक्तीच्या उच्च अवस्था प्राप्त करून घेईल. तेव्हा त्यांनी मोठ्या करुण चित्ताने म्हटले –

"तर मग भिक्षू लक्ष देऊन ऐक! मी तुला धर्मदेशना देत आहे."

असे आकर्षण होते भगवानांच्या त्या करुणासिक्त वाणीत की भिक्षू नाही म्हणूच शकला नाही. तो म्हणाला, "खूप चांगले आयुष्मान!" आणि दत्तचित्त होऊन त्यांची कल्याणी वाणी ऐकू लागला.

पूर्वजन्मांच्या अभ्यासामुळे स्वर्णपत्रावर आनापानच्या साधनेचे केवळ वर्णन वाचून तो स्वत: चौथ्या ध्यान समापत्तीच्या अनुभूतीपर्यंत पोहोचला होता. भगवानांनी आता त्याला धातुंच्या विभंगाला समजावत विपश्यनेच्या सखोलतेत उतरविले.

पृथ्वी, अग्नी, जल, वायू, आकाश ही पाच भौतिक तत्वे आहेत आणि विज्ञान, हे एक मानसिक तत्त्व. या तत्वांचा समुच्चयच मनुष्य आहे. या सहांना विभाजित करून, यांच्या धातुला म्हणजे यांच्या धर्म-स्वभावाला अनुभूतींच्या स्तरावर जाणून घेणे हेच धातु विभंग आहे. या सहा तत्वांच्या व्यतिरिक्त डोळे, कान, नाक, जीभ, त्वचा आणि विज्ञान (मन) ही सहा इंद्रिये आणि यांच्या आपापल्या विषयांच्या संस्पर्शाने उत्पन्न होणाऱ्या सुखद-दु:खद अथवा असुखद-अदु:खद संवेदनांच्या 18 प्रकारच्या अनुभूतींमध्ये विचरण करत राहणाऱ्या स्वभावाला विभाजित करून पाहणे, यांना मी, माझे आणि माझा आत्मा न मानता मिथ्या अहंच्या भ्रम-भ्रांतिजनक मरीचिकेतून मुक्त होणे, मिथ्या मान्यतांच्या गुलामीतून सुटका मिळवणे हीच विपश्यनेची विभंग साधना आहे. या साधनेद्वारे निरंतर अनित्य-बोधिनी संप्रज्ञेत सतत अधिष्ठित राहणे, म्हणजेच स्थितप्रज्ञ बनून राहणे, इंद्रियजगताच्या अनित्य आणि इंद्रियातीतच्या नित्य स्वभावाच्या सत्यतांना स्वानुभूतीने जाणून सत्यात सतत अधिष्ठित राहणे, मिथ्या अहंभावातून उत्पन्न झालेल्या आसक्ती-द्वेष आणि मोहासारख्या विकारांच्या त्यागात सतत अधिष्ठित राहणे आणि विकारमुक्तीद्वारे प्राप्त झालेल्या चित्ताच्या शांतीत अधिष्ठित राहणे हेच धातुविभंग उपदेशाचे चार प्रमुख उद्देश आहेत.

भगवान जस-जसे या उपदेशाच्या बारकाव्यांना समजावत गेले, तस-तसा पुक्कुसाति लोकीय ध्यानाला संप्रज्ञानाशी जोडून लोकोत्तर ध्यानांमध्ये बदलवत गेला. आता त्याची समाधी केवळ ध्यानसमापत्तींपर्यंतच सीमित राहिली नाही. संप्रज्ञानाच्या विपश्यनेद्वारे अधोगतीच्या संपूर्ण संस्कारांचा क्षय करून त्याने पहिल्या स्रोतापत्तिच्या निर्वाणिक फल-समापत्तीला अनुभूतीवर उतरविले आणि त्यानंतर सकदागामीच्या फल-समापत्तीला.

भगवान समजावत चालले होते आणि त्याचबरोबर मैत्रीधातु, धर्मधातु आणि निर्वाणधातुने साऱ्या वातावरणाला आप्लावित करत होते. श्रद्धाळू पुक्कुसाति नुसता ऐकतच नव्हता तर आतल्या आत विपश्यना प्रज्ञेद्वारे घनीभूत सत्यतांचे छेदन-भेदन करत शिल्लक राहिलेल्या कर्मसंस्कारांचे उच्छेदनही करत होता.

रजनीकांत निशाकर आपल्या रजत रश्मींना आवरून घेत पश्चिम क्षितिजाकडे अस्तंगत होत होता. भुवन-भास्कराचा आपल्या स्वर्ण-रश्मींना विकीर्ण करत पूर्व क्षितिजातून उदय होऊ लागला होता. याच वेळी पुक्कुसाति भगवानांच्या महाकारुणिक धर्मतरंगांचे बळ प्राप्त करत- करत विपश्यनेच्या सूक्ष्म तळस्पर्शी सखोलतांकडे अग्रेसर होत गेला. अचानक त्याला चौथ्या ध्यानाच्या समापत्तीबरोबरच पहिल्या निरोध समापत्तीची निर्वाणिक अनुभूती झाली. तो अनागामी-फळ लाभी झाला.

या निरोधसमापत्तीतून तो उठला तेव्हा कृतज्ञता-विभोर झाला. अशी मुक्तीदायिनी विपश्यना भगवान बुद्धांच्या व्यतिरिक्त दुसरे कोणी शिकवूच शकत नाही. अवश्य हे भगवान बुद्धच आहेत. हा विचार मनात येताच त्याच्या मुखातून हर्षोद्गार बाहेर पडले.

"अहा! मला माझा शास्ता मिळाला, सुगत मिळाला, सम्यक संबुद्ध मिळाले." असे म्हणत पुक्कुसातिने आपले मस्तक भगवानांच्या चरणांमध्ये ठेवले. नंतर उजवा खांदा उघडा ठेवून आपल्या उत्तरासंगाला म्हणजे उर्ध्व-वस्त्राला डाव्या खांद्यावर ठेवत (हे त्या काळातील सन्मान प्रदर्शन होते) हात जोडून म्हणाला –

"भंते भगवान! अजाणतेपणे माझ्याकडून खूप मोठा अपराध घडला आहे. मी आपल्या अज्ञान अवस्थेत, मूढ अवस्थेत आपल्याला ओळखू शकलो नाही. म्हणून आपल्याला आयुष्मान शब्दाने संबोधित करून मी अत्यंत अकुशल कर्म केले. (पदाने किंवा वयाने आपल्याहून लहानांसाठी आयुष्मान शब्दाचा उपयोग होत होता.) भगवानांनी माझ्या या अपराधाला क्षमा करावी. भविष्यात माझ्याकडून अशी चूक होणार नाही."

"भिक्षू अजाणतेपणे झालेली स्वत:ची चूक तू स्वीकारली आहेस. तिचा उचित प्रतिकार केला आहेस. आर्य धर्म-विनयात हे प्रगतीचे लक्षण आहे की जेव्हा कोणी आपली चूक स्वीकारतो, तिचा प्रतिकार करतो आणि भविष्यात ती न करण्याचा संकल्प करतो."

"भगवान, मला आपल्याकडून उपसंपदा मिळावी"

"भिक्षू, काय तुझ्याकडे परिपूर्ण पात्र-चीवर आहे?"

"नाही भंते, परिपूर्ण नाही."

"भिक्षू, अपूर्ण पात्र-चीवर असणाऱ्याला तथागत उपसंपदा देत नाहीत."

तेव्हा आयुष्मान पुक्कुसाति भगवानांच्या वचनाचे अभिनंदन करून, आसनावरून उठला आणि त्यांना अभिवादन केले, त्यांची प्रदक्षिणा केली आणि पात्र-चीवरच्या शोधात नगराकडे निघाला.

सूर्योदय होताच नगरद्वारे उघडली. नगरातील काही नागरिक आणि भिक्षू बाहेर आले तेव्हा भार्गव कुंभारच्या अतिथिशाळेत अनपेक्षितपणे भगवानांना बसलेले पाहिले. त्यांनी भगवानांना सादर अभिवादन केले. काही लोक धावत महाराज बिंबीसारकडे पोहोचले. तो ही त्वरीत भगवानांच्या सेवेत हजर झाला आणि भगवानांना पंचांग प्रणाम करून भार्गव कुंभारच्या अतिथिशाळेत बसला.

इतक्यात समाचार मिळाला की पात्र-चीवरच्या शोधात निघालेला भिक्षू एका दुर्घटनेत मृत्यूला प्राप्त झाला आहे.

भगवानांनी सांगितले की तो व्यक्ती गांधारनरेश होता की जो मित्राचा धर्मसंदेश वाचून, राजपाट त्यागून प्रव्रजित होण्यासाठी मगधला आला

होता. पुक्कुसाति समजदार होता. तो परम सत्यान्वेषी होता. शुद्ध धर्म जस-जसा ऐकत गेला तस-तसा स्थूलहून सूक्ष्म सत्यांकडे अग्रेसर होत मुक्तीच्या दिशेने पुढे जात राहिला. धर्माला समजण्यात आणि धारण करण्यात त्याने कुठेही हेकटपणा, हट्टीपणा दाखवला नाही. आजच्या रात्रीतच त्याने विपश्यना साधनेद्वारे अनागामी फळ प्राप्त केले, ज्यामुळे त्याची सारी अवरभागीय संयोजने-बंधने तुटून गेली. आता तो ओपपातिक ब्रह्मलोकात जन्मला आहे. तिथे विपश्यना करत अर्हत्व फळ प्राप्त करेल आणि तिथेच शरीर त्यागल्यावर परिनिर्वाणलाभी होऊन समस्त लोकांच्या भवभ्रमणातून पूर्णपणे विमुक्त होऊन जाईल.

बिंबीसार आपल्या न पाहिलेल्या मित्राच्या मृत्यूच्या समाचाराने दुःखी तर झालाच, परंतु लगेच त्याचे हे दुःख मुदितेमध्ये बदलून गेले जेव्हा त्याने हे ऐकले की त्याचा मित्र अनागामी फळ प्राप्त करून मृत्यूला प्राप्त झाला आहे. त्याला वाटले की त्याचा धर्म-संदेश अतिशय योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचला आणि तो भगवानांच्या आणि विपश्यनेच्या संपर्कात येऊन यथोचित लाभान्वित झाला आहे.

बिंबीसारने भगवानांची वाणी ऐकून प्रसन्नता व्यक्त केली आणि तीन वेळा साधु, साधु, साधु म्हणून त्यांच्या चरणांना नमन केले.

खरोखर त्याची धर्म-मैत्री सफल झाली, सार्थक झाली. त्याच्या मित्राचे मंगल झाले, कल्याण झाले. असे मंगल-कल्याण सर्वांचे होवो !

*– वर्ष 20, बुद्धवर्ष 2535, ज्येष्ठ पौर्णिमा, दि. 26-06-1991, अंक 13 हिंदी पत्रिके मधून साभार*

------0------

## ऑनलाइन भावी शिबिर कार्यक्रम व आवेदन

सर्व भावी शिबिरांची माहिती नेटवर खालील लिंक्स वर उपलब्ध आहे. सर्व प्रकारचे बुकिंग केवळ ऑनलाईन होत आहे. म्हणून आपल्याला निवेदन आहे की खालील लिंक वर चेक करा आणि आपल्याला उपयुक्त शिबिरासाठी अथवा सेवेसाठी सरळ ऑनलाईनच आवेदन करावे. https://www.dhamma.org/en/schedules/schgiri

विश्वभरातील सर्व भावी शिबिरांची माहिती व आवेदनासाठी:
***https://schedule.vridhamma.org* व *www.dhamma.org***
अन्यथा ***https://www.dhamma.org/en-US/locations/directory#IN***

-----0-----

## अति महत्वपूर्ण सूचना

1. सेंट्रल आईवीआर (इंटरैक्टिव्ह वॉयस रिस्पॉन्स) संभाषण नंबर- ०२२-५०५०५०५१ अर्जदार या नंबरवर आपल्या नोंदवलेल्या मोबाईल नंबर (फॉर्म मधील उल्लेखित नंबर) ने आपली शिबिर नोंदणीची स्थिति तपासण्यासाठी, रद्द करण्यासाठी, स्थानांतरीत करण्यासाठी अथवा कुठल्याही सेंटरवर नोंदणी केलेल्या आपल्या अर्जाची पुष्टी करण्यासाठी कॉल करू शकतात. ते या सिस्टीमद्वारे केंद्राशी सुद्धा संपर्क करू शकतात. हा भारताच्या सगळ्या विपश्यना केंद्रांसाठी एक केंद्रीय संपर्क नंबर आहे.

2. जर अकेंद्रीय (नॉन-सेंटर) भावी शिबिरांचे कार्यक्रम पत्रिकेत प्रकाशन करण्यासाठी पाठवू इच्छिता, तर कृपया त्यांनी आपल्या समन्वयक क्षेत्रिय आचार्य (सीएटी) यांच्या सहमती पत्राबरोबर पाठवावे, जेव्हा की स्थापित केंद्राचे कार्यक्रम केंद्रीय आचार्य (सीटी) यांच्या सहमती पत्राबरोबर आले पाहिजेत. याशिवाय आम्ही कोणतेही कार्यक्रम पत्रिकेत प्रकाशित करू शकत नाही.

-----0-----

## पॅगोड्यावर रात्रभर प्रकाशाचे महत्व

पूज्य गुरुजी वेळोवेळी म्हणत असत की एखाद्या **धातु-गब्भ** पॅगोड्यावर रात्रभर प्रकाश असण्याचे विशेष महत्व आहे. यामुळे सारे वातावरण दीर्घकाळ धर्म व मैत्री तरंगांनी भारलेले राहाते. तात्पर्य आपल्या नातेवाईकांच्या आठवणी निमित्ताने ग्लोबल पॅगोड्यावर प्रकाश दानासाठी प्रती रात्री रुपये 5000/- निर्धारित केले गेले आहेत.

**Bank Details:** 'Global Vipassana Foundation' (GVF),
Axis Bank Ltd., Sonimur Apartments,
Timber Estate, Malad (W), Mumbai - 400064,
Branch- Malad (W). Bank A/c No.- 911010032397802
IFSC No.- UTIB0000062 Swift code: AXIS-INBB062
अधिक माहितीसाठी संपर्क – 1. Mr. Derik Pegado, 9921227057,
2. Sri Bipin Mehta, Mo. 9920052156 Email: audits@globalpagoda.org

## विपश्यना विशोधन विन्यास

विपश्यना विशोधन विन्यास (Vipassana Research Institute=VRI) एक अशी संस्था आहे जी साधकांकरीता धर्मासंबंधी प्रेरणादायक पाठ्य सामग्री मूळ किंमतीवर उपलब्ध करवून देते. इथले सर्व साहित्य अतिशय कमी किंमतीवर उपलब्ध आहे जेणेकरून जास्तीत जास्त साधक याचा व्यावहारिक लाभ घेऊ शकतील. विपश्यना साधनेसंबंधी अनमोल साहित्याचा हिंदी, इंग्रजी तसेच इतर भाषांमध्ये अनुवाद तसेच शोधकार्य करायचे आहे त्याकरीता विद्वानांची आवश्यकता आहे. शोधकार्य मुंबईच्या या पत्त्यावर होत असते- **'विपश्यना विशोधन विन्यास'**, परियत्ति भवन, विश्व विपश्यना पगोडा परिसर, एस्सेल वर्ल्डच्या जवळ, गोराई गाव, बोरीवली पश्चिम, मुंबई- 400 091, महाराष्ट्र, भारत. फोनः कार्यालय: +9122 50427560, मो. (Whats App) +91 9619234126.

याव्यतिरिक्त VRI हिंदी, इंग्रजी आणि मराठीच्या मासिक पत्रिकांच्या माध्यमातून पूज्य गुरुजींच्या द्वारे झालेले पत्राचार, जुने ज्ञानवर्धक लेख, दोहे, इंटरव्यूह, प्रश्नोत्तर इत्यादींच्या स्वरूपाने प्रेरणाजनक संस्मरणांना प्रकाशित करत असते ज्यामुळे साधकांची धर्मपथावर उत्तरोत्तर प्रगती होत राहिल. या सर्व कार्यांना पुढे अविरतपणे चालू ठेवण्यासाठी साधकांचा सहयोग अत्यंत आवश्यक आहे. भविष्यात अनेक साधकांच्या लाभार्थ धर्मवाणीचे प्रकाशन अविरतपणे चालू राहावे याकरीता यामध्ये सहयोग देणाऱ्या इच्छुक साधकांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क करावा. या संस्थेमध्ये दानशूरांसाठी सरकारकडून आयकर अधिनियम 1961 च्या धारा 35-(1) (iii) या नियमानुसार 100% आयकराची सूट उपलब्ध आहे. साधक याचा लाभ घेऊ शकतात. **दानासाठी बँक विवरण अशा प्रकारे आहेः—**

**विपश्यना विशोधन विन्यास,** एक्सिस बँक लि., मालाड (प.)
खाते क्र. 911010004132846; IFSC Code: UTIB0000062
**संपर्क-** 1. श्री डेरिक पेगाडो - 022-50427512/ 28451204
2. श्री बिपिन मेहता - 022-50427510/ 9920052156
3. ईमेल - audits@globalpagoda.org
4. वेबसाइट- https://www.vridhamma.org/donate-online

---0---

### अतिरिक्त उत्तरदायित्व

1. कु. प्रीति डेढिया, क्षेत्रीय संयोजक आचार्य तमिलनाडु
2. श्री भक्त प्रसाद पौडेल, नेपाळचे सहायक आचार्य प्रशिक्षक समन्वयक
3. श्रीमती अंबिका श्रेष्ठ, धम्म विराट, नेपाळचे केंद्र-आचार्यांची सहायता
4. श्री गंगाराम प्रजापति, धम्म कुटी, रायपुरचे (छत्तीसगढ़) केंद्र-आचार्यांची सहायता
5. श्री विलास शिंदे, धम्मपठार, अहमदनगर केंद्राचे केंद्र-आचार्य

### अतिरिक्त उत्तरदायित्व आचार्य

1-2. श्री दिनेश व श्रीमती शोभना शाह, अहमदाबाद, गुज. धर्माचा प्रसार
3-4. श्री सज्जन व श्रीमती नीरू गोयन्का, धम्म पाटलिपुत्त, पटना, बिहार केंद्राचे केंद्र-आचार्य
5. श्री निरंजन सिन्हा, धम्मवेसाली, वैशाली, बिहार केंद्राचे केंद्र-आचार्य

#### नवे उत्तरदायित्व
### वरिष्ठ स. आचार्य

1. श्री नरेश पटेल, अहमदाबाद, गुज.
2-3. श्री केतन व श्रीमती जयश्री पटेल, अहमदाबाद, गुज.
4. श्री आर सी गुप्ता, गुरुग्राम, हरियाणा
5. श्रीमती राजलक्ष्मी सिद्धार्थन करियाल, गुरुग्राम, हरियाणा
6. श्री सतवीर मान, करनाल, हरियाणा
7. श्रीमती नीलम बुलचन्दानी, चेन्नई

#### नव नियुक्त
### सहायक आचार्य

1. श्री प्रकाश चंद्र, बेंगलूरु
2. श्री मरिकांती नरसिम्हा राव, हैदराबाद
3. श्रीमती रजिनी कोट्ला, सिकन्दराबाद
4. श्रीमती निर्मला सिलेकर, नागपूर
5. श्रीमती वर्षा सोनकुसरे, नागपूर
6. कु. गंगा के. मूलचंदानी, कच्छ
7. श्री निश्चिंथ जालान, कोलकाता
8. श्री जीतेंद्र यादव, नेपाळ
9. श्रीमती प्रमिला डांगोल, नेपाळ
10. श्रीमती रेनू कर्ना, नेपाळ
11. Mr. Jiesheng XIe, China
12. Mrs. Xiaohong Mo, China

### बालशिबिर शिक्षक

1. श्री. प्रवीण विलास दाते, अहमदनगर
2. श्री. शैलेश श्रीकांत सुतार, पुणे
3. कु. अरुणिमा श्रीवास्तव, देहरादून
4. श्री. भरतसिंह रतन पावरा, शहादा
5. श्रीमती सारिका प्रीतमसिंग पाटिल, जळगांव
6. श्री. प्रदीप ज्ञानेश्वर पाटिल, जळगांव
7. श्री. रोशन मोरे, जळगांव
8. श्री. तुषार शांताराम धांडे, जळगांव
9. श्री. योगेश यशपाल अहिरे, जळगांव
10. श्रीमती सुजल मधुकर भोसले, जळगांव
11. श्री. ईश्वरलाल मणिलाल जाधव, जळगांव
12. श्रीमती भारती मदन, नोएडा
13. श्री. नरेश कुमार, दिल्ली
14. श्री अनिलभाई सोनाग्रा, जामनगर
15. श्रीमती पूजा मल्होत्रा, हरियाणा
16. श्री. कमलेशभाई शामजीभाई झापडिया, राजकोट
17. श्रीमती प्रथना राजेश शीलु, राजकोट
18. Ms. Beatriz Baz, Spain
19. Mr. Daniel Aleksandrov, Bulgaria
20-21-Mr. Vinzenz and Mrs. Florence Luginbuhl, Switzerland
22. Mr. Constantin zaika, Ukraine
23. Miss Lin WANG, Guangdong China
24. Mr. Kimchuy EAM, Cambodia

## ग्लोबल विपश्यना पगोडा, गोराई, मुंबईमध्ये

**1. एक दिवसीय महाशिबिर (Mega Course) कार्यक्रमः**

**रविवार 29** सप्टेंबर, भाद्रपद-पौर्णिमा व पूज्य गुरुजींच्या पुण्य-तिथि निमित्ताने
**रविवार 19** जानेवारी 2025 सयाजी ऊ बा खिन व माताजींच्या पुण्य-तिथि निमित्ताने
**एक दिवसीय** महाशिबिर होतील.

**Email:** *oneday@globalpagoda.org* **Online registration:** *http://oneday.globalpagoda.org/register*

**2. एक दिवसीय शिबिर दररोज**

या व्यतिरिक्त विपश्यना साधकांसाठी पगोडा मध्ये दररोज एक दिवसीय शिबिर आयोजित केली जात आहे. कृपया सामील होण्यासाठी खालील लिंक चा उपयोग करावा. आणि एक मोठ्या सामूहिक तप-सुखाचा लाभ घ्यावा. *समग्गानं तपोसुखो।* **संपर्क: 022 50427500 (Board Lines)** - Extn. no. 9, मो. **+91 8291894644.** (प्रतिदिन 11 से 5 बजे तक)

Online registration: http://oneday.globalpagoda.org/register; **Email:- guruji.centenary@globalpagoda.org or** Email: oneday@globalpagoda.org

### 'धम्मालय' विश्राम गृह

एक दिवसीय महाशिबिरासाठी आल्यावर रात्री **'धम्मालय'** मध्ये विश्रातीसाठी सुविधा उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी आणि (बुकिंग) नोंदणीसाठी **संपर्कः** 022 50427599 or email- *info.dhammalaya@globalpagoda.org or info@globalpagoda.org*

## पूज्य गुरुजींची 11वी पुण्यतिथि

येणाऱ्या 29 सप्टेंबरला पूज्य गुरुजींची 11वी पुण्यतिथि आहे. या पावन प्रसंगी आपण यथासंभव जितकी अधिक साधना करू शकू, तीच त्यांच्याप्रति आपली खरी श्रद्धांजली ठरेल. !! सर्वांचे मंगल होवो!!

## मोबाईल ॲप मध्ये नवीन सुधारणा

विपश्यना विशोधन विन्यासाने आपल्या मोबाईल ॲपमध्ये एक नवीन सुधारणा केली आहे, ज्यामुळे आपण भविष्यातील शिबिरांमध्ये भाग घेण्यासाठी सरळ ॲप द्वारेच आवेदन करू शकता. जसे -

**दहा दिवसीय शिबिर, दहा दिवसीय एक्झिक्यूटिव्ह शिबिर,**
**लहान मुलांचे शिबिर, तीन दिवसीय शिबिर इत्यादी**

भारतातील सर्व केंद्र, तसेच दक्षिण आफ्रिका, केनिया, इंडोनेशिया, संयुक्त अरब अमिरात इत्यादी देशांत कुठेही. एकदा आपण आवेदन केल्यावर त्याच ॲप मध्ये आपण आपल्याविषयी होणाऱ्या सर्व गतीविधींची माहिती प्राप्त करू शकता.

आपल्याला वाटले तर आपण आपल्या शिबिरांची नोंदही ठेवू शकता.

सध्या हे नवीन फीचर्स फक्त अँड्रॉइड फोनसाठी उपलब्ध आहेत आणि लवकरच ते आईओएस (आय फोन) साठी उपलब्ध केले जातील.

डाऊनलोड करा ॲप लिंक: *http://vridhamma.org/applink.html*

**सूचनाः** कृपया लक्षात घ्या की या ॲप मध्ये कोणत्याही भाषेतील पत्रिका/ ***Newsletters*** वाचू शकता आणि तिला डाऊनलोड करून तिची प्रिंट पण काढू शकता.

### दोहे धर्माचे

बघून त्याची पात्रता, अल्प आयु लघु प्राण।
धर्म शिकवण्या स्वंयही, पोहचले भगवान॥
उज्ज्वल धातू विभंगचा, दिला धर्म उपदेश।
ऐकता ऐकता तुटती, निज कर्मांचे च क्लेश॥
अनिल अग्नी जल भूमीचा, होय व्योमात मेळ।
जोडली चित्त चेतना, होय नियतीचा खेळ॥
प्रकटे सहा इंद्रिय, सहा खिडक्या द्वारे।
आपापल्या विषयाचा, होय सतत प्रहार॥
सुखद दुःखद संवेदना, विषय स्पर्श संयोग।
बघत च अनित्य स्वभाव, दूर होय भवरोग
आता ना जागे लोभ, ना जागे रे द्वेष।
काम लोक भव चक्रातूनबंधन होय अशेष॥

### दोहे धर्माचे

पुण्य उदय होय याचे, बुद्ध समागम होय।
झाला समागम बुद्धांशी, धर्म समागम होय॥
धर्म समागम होय तर, उघडे चक्षु च ज्ञानाचे।
अंतरी जागे चेतना, ऐके बोल धर्माचे॥
अंतरी काया चित्ताचा, दिसला रे प्रपंच।
हटले वादळ मोहाचे, भ्रम राही न रंच॥
तन मन जीभ अन् कान, डोळे च नस्य द्वार।
होय स्पर्श विषयाशी, प्रकटे भव संसार॥
स्पर्श होता वेदना, आहे अनित्य बोध।
तर तुटे संसार क्रम, होई चित्त विशोध॥
होई दर्शन सत्याचे, जागे च खरे ज्ञान।
तर आपणची प्रकटेपरम, सत्य च निर्वाण॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादक: राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनी: (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2568, भाद्रपद पौर्णिमा, 18 सप्टेंबर, 2024 वर्ष 8 अंक 6

वार्षिक शुल्क रु. 100/-, US $ 50, (भारताबाहेर पाठविण्यासाठी) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK/RNP 286/2024-2026

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) **(किरकोळ विक्री होत नाही)**
**DATE OF PRINTING: 03 SEPTEMBER, 2024, DATE OF PUBLICATION: 18 SEPTEMBER, 2024**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
**धम्मगिरी, इगतपुरी - 422 403**
**जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत**
**फोन : (02553) 244998, 243553, 244076, 244086, 244144, 244440**
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org